# ‘वैश्विक राजभाषा’ सोफ्टवेअर खांडबहाले.कॉम यांच्याकडून राष्ट्रपतींना सादर

भारतीय प्रादेशिक भाषा व देशी भाषा यांचे माहिती तंत्रज्ञानाच्या माध्यमातून संवर्धन, प्रचार आणि प्रसार ह्या उद्देश्पुर्तीसाठी तयार करण्यात आलेले वैश्विक राजभाषा हे सोफ्टवेअर काल (सोमवार दि. १२ डिसेंबर) अमरावती येथे भारताच्या महामहीम राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील यांना खांडबहाले.कॉम (www.khandbahale.com) चे निर्माते सुनील खांडबहाले यांनी सादर केले. यावेळी खांडबहाले यांचे वडील श्री. शिवाजी गंगाधर खांडबहाले, आई सौ. मीराबाई शिवाजी खांडबहाले, सहकारी श्री. मिलिंद महाजन व जयंत भालेराव सोबत होते. जगभर इंटरनेट वापरणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे त्यांत भारतीयांनी देखील १० कोटींचा टप्पा गाठलेला आहे. आतापर्यंत फक्त संगणकावरुनच इंटरनेट वापरले जायचे परंतु आता जी.पी.आर.एस. तथा ३ जी. क्रांतीमुळे मोबाईल वरून इंटरनेट वापरणाऱ्यांच्या संख्येतही लक्षणीय वाढ होताना दिसत आहे. नेमकी हीच बाब लक्षात घेऊन नाशिकच्या सुनील खांडबहाले व त्यांच्या टीमने गेली २ वर्ष अथक प्रयत्न करून नवीन प्रणाली विकसित केली आहे. संगणकावर विंडोज, लिनक्स, मेकिंतोष, युनिक्स तसेच मोबाईलवर सिंबियन, विंडोज, जावा, अँन्ड्रॉईड अशा विविध ऑपेरेटिंग सिस्टम्समुळे सर्वंकष अशी प्रणाली निर्माण करणे मोठे आव्हान होते. त्यांत इंटरनेट वापरासाठी जें ब्राउजरस् वापरले जातात त्यातही बरीच विविधता असल्याने भारतीय भाषांमध्ये लिपी दाखविणे कठीण होते. परंतु खांडबहाले.कॉम ने विकसित केलेले हे सोफ्टवेअर कोणत्याही ऑपेरेटिंग सिस्टम् तसेच कोणत्याही इंटरनेट ब्राउजर वर चालण्यास समर्थ आहे. माक्रोसोफ्ट चे इंटरनेट एक्सप्लोरर, गुगलचे क्रोम, मोझीलाचे फायरफॉक्स, एप्पलचे सफारी तसेच मोबाईलवरील लोकप्रिय ओपेरासह जगातील सर्व इंटरनेट ब्राउजरस् ला सुसंगत अशी प्रणाली आहे. भारत हा विविध राजभाषा असलेला जगाच्या पाठीवर एकमेव देश आहे आणि या राजभाषा जगभर पोहचवून खऱ्या अर्थाने वैश्विक करण्यासाठी ‘वैश्विक राजभाषा’ असे या प्रणालीचे नामकरण करण्यात आले आहे. भारतीय भाषांचे संवर्धन आणि प्रचार-प्रसार करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानचा योग्य वापर हाच एक ठोस पर्याय होऊ शकतो हे खांडबहाले.कॉम ने आजवर सिद्ध केले आहे. जगभरातील १५० देशांमध्ये या वेबसाईटचे व त्यावर असलेल्या विविध संगणक आणि मोबाईल तसेच वेब सर्व्हिसेस चे ४ कोटी वापरकर्ते आहेत. त्यामुळे भारतीय भाषांना एक वैश्विक परिमाण देण्यात खांडबहाले.कॉम चे महत्वपूर्ण योगदान आहे. त्यांच्या ह्याच कार्याची दखल घेत देशाच्या महामहीम राष्ट्रपती यांनी खांडबहाले यांना भेटीची वेळ दिली होती. या भेटी दरम्यान या सोफ्टवेअर चे सादरीकरण व चर्चा करून हे सोफ्टवेअर राष्ट्राला अर्पण करण्यात आले. ह्या सोफ्टवेअर मुळे इंटरनेट वापरत असताना, कोणतीही वेबसाइट बघत असताना किंवा ईमेल तपासत असताना आपल्याला कोणताही शब्द अडल्यास त्या शब्दाला राईट-क्लिक केल्यास भारतातील १० प्रमुख भाषांमध्ये भाषांतरित करण्याचा पर्याय उपलब्ध होतो. ज्यामध्ये मराठी, हिंदी, गुजराती, तमिल, तेलुगु, कन्नड, मल्याळम, पंजाबी, बंगाली, संस्कृत तसेच इंग्रजी अशा भाषा आहेत. विशेष म्हणजे एखादी मराठी, हिंदी अथवा कुठलीही प्रादेशिक भाषेतील वेबसाईट बघताना देखील त्याला इंग्रजी पर्याय उपलब्ध होतो. डाउनलोड करून घेतल्यास आपण बघत असलेले वेब पेज न सोडता कोणताही शब्द हव्या त्या भाषेत समजून घेता येतात. त्याचा वापर कसा करायचा ह्याचे व्हिडीओ प्रात्यक्षिकही वेबसाईटवर उपलब्ध आहे. महामहीम राष्ट्रपती यांनी खांडबहाले टीमचे व सुनील खांडबहाले यांच्या आई-वडिलांचे कौतुक केले व देशाच्या विकासात असाच हातभार लावण्यासाठी सदिच्छा व्यक्त केल्या. स्वत:ला उपयोग झाला म्हणून इतरांनाही तो व्हावा ह्या सामाजिक भावनेतून सुरु झालेला खांडबहाले.कॉम चा प्रवास आता खऱ्या अर्थाने वैश्विक झालेला आहे. हे सोफ्टवेअर आपण वापरत असलेल्या इंटरनेट ब्राउजरसाठी www.khandbahale.com इथून विनाशुल्क डाउनलोड करता येईल.



